# प्रकरण - सहा

## निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना :

कोणताही विषय शिकताना किंवा शिकविताना आनंद वाटला पाहिजे हे टागोरांचे शिक्षणविषयक पहिले सूत्र होते. प्रस्तुत शोध निबंधात " अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम व त्यामधील प्राध्यापक व प्रशिक्षणार्थी यांच्या समस्यांचा चिकित्सात्मक अभ्यास " या विषया संदर्भात प्रात्यक्षिके करत असताना व प्रात्यक्षिके करवून घेत असताना येणाऱ्या समस्या बाबतचा विचार केलेला आहे. मागील दोन प्रकरणात (प्रकरण चार - अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम करत असताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या आणि प्रकरण पाच - अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम करवून घेत असताना प्राध्यापकांना येणाऱ्या समस्या) विद्यार्थी प्रश्नावली व प्राध्यापक प्रश्नावलीद्वारे प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविले आहेत.

६.२ अध्यापक महाविद्यालयात प्रात्यक्षिक काम करत असताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्याबाबत निष्कर्ष आणि शिफारशी :

प्रस्तुत विभागात प्रकरण क्र. ४ (अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम करत असताना येणाऱ्या समस्या) यामधील विद्यार्थ्यांच्या समस्यांचा विचार केला असता विद्यार्थ्यांच्या प्रश्नावलीद्वारा आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्याचे विवरण केलेले आहे व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे :

१) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.१ (अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता)वरून असा निष्कर्ष निघतो की १२० प्रशिक्षणार्थ्यांपैकी ८१ पदवीधर होते व ३५ पदव्युत्तर परीक्षा दिलेले होते व ४ कमीतकमी पदवीधर असावेत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
UNIVERSITY KOLHAPUR

२) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.२ (सर्व प्रात्यक्षिके पूर्ण होतात की नाही) सारणी क्र. ४.३ (सर्व प्रात्यक्षिके पूर्ण होण्याची कारणे) सारणी क्र. ४.४ (सर्व प्रात्यक्षिके पूर्ण न होण्याची कारणे) यावरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयातील सर्व प्रात्यक्षिके पूर्ण होतात असे ७५ टक्के म्हणजेच बहुसंख्या परीक्षार्थींनी सुचविले असले तरी असे सुचविण्याचे प्राध्यापकांच्याकडून योग्य मार्गदर्शन मिळते हे एकमेव प्रबळ कारण दिलेले आहे. परंतु प्रात्यक्षिके पार पाडत असताना वेळ अपुरा पडतो, पुरेशी साधने उपलब्ध होत नाहीत, प्राध्यापकांची संख्या अपुरी आहे, प्रात्यक्षिके पार पाडत असताना स्वतंत्र हॉलचा अभाव सर्व प्रात्यक्षिके पार पाडण्यासाठी प्रशिक्षित प्राध्यापक नाहीत या विशेष अडचणी येतात. यासाठी सबब अशा शिफारशी कराव्याशा वाटतात की, अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिकांना वेळ वाढवून द्यावा, सर्व प्रात्यक्षिकांना लागणारे साहित्य उपलब्ध करून द्यावे. प्राध्यापकांची १० विद्यार्थ्यांस १ या प्रमाणात पुरेशी संख्या महाविद्यालयाने उपलब्ध करून द्यावी. ज्या महाविद्यालयामध्ये १०:१ या प्रमाणात विद्यार्थी संख्या नाही त्या महाविद्यालयामध्ये पुरेसे पूर्णवेळ प्राध्यापक भरण्याची विद्यापीठाने कडक सक्ती करावी, वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांच्या योग्य कार्यवाहीसाठी प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविण्याची कॉलेजने व्यवस्था करावी. त्यासाठी विद्यापीठाने सेवांतर्गत प्रशिक्षणाचे उपक्रम राबवावेत. सांस्कृतिक कार्यक्रम, मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने यासाठी स्वतंत्र हॉल उपलब्ध करून द्यावेत.

३) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.५ (प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीतून सर्व उद्दिष्टे पूर्ण होता की नाही) क्रमांक ४.६ (प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीतून त्यांना ठेवलेली सर्व उद्दिष्टे साध्य होतात असे वाटण्याची कारणे) सारणी क्र.४.७ (प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीमधून त्यांना ठेवलेली सर्व उद्दिष्टे साध्य होत नाहीत असे वाटण्याची कारणे) या वरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयातील सर्व प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीमधून त्यांना ठेवलेली उद्दिष्टे साध्य होतात असे ५९.०० टक्के प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविले असले

तरी असे सुचविण्याची प्राध्यापकांकडून योग्य मार्गदर्शन मिळते व प्राध्यापकांना प्रात्यक्षिका बाबत पूर्ण ज्ञान असते ही दोनच प्रमुख कारणे दिलेली आहेत.परंतु उद्दिष्टे साध्य होण्यामध्ये पुढील अडचणी येतात असे दिसून येते.

१. प्रात्यक्षिकांची संख्या वेळेच्या मानाने जास्त आहे.
२. कोणत्या प्रात्यक्षिकामधून कोणती उद्दिष्टे साध्य होतात हे समजत नाही.
३. मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या अपुरी आहे.
४.थेअरी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ५० टक्के गुण मिळण्याची अट त्यामुळे प्रात्यक्षिकांकडे दुर्लक्ष होते.

वरील समस्यांपैकी समस्या १ व समस्या क्र. ३ याबाबत यापूर्वीच पा.क्र. १९५ वरती शिफारशी केलेल्या आहेत.

समस्या क्रमांक २ बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की अभ्यासक्रम मंडळाने (बी.ओ.एस.) प्रत्येक प्रात्यक्षिकासाठी कोणती उद्दिष्टे ठेवलेली आहेत ती बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत दिली जावीत. तसेच प्राध्यापकांनी सुध्दा प्रात्यक्षिक कामांच्या थेअरीचा भाग शिकवत असताना त्यांना ठेवलेली उद्दिष्टे स्पष्ट करावीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिकांना ठेवलेली उद्दिष्टे समजतील व ती साध्य करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी वाटचाल करतील.

समस्या क्र. ४ बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की अभ्यासक्रम मंडळाने थेअरी परीक्षेत उत्तीर्ण होण्याची अट पूर्वीप्रमाणेच ४० टक्के गुण ही करावी म्हणजे थेअरी परीक्षेची भीती विद्यार्थ्यांना वाटणार नाही व प्रात्यक्षिक काम मन लावून करतील व त्यामुळेप्रात्यक्षिकांना ठेवलेली उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होईल.

४) प्रकरण चारमधील विविध प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता (प्रशिक्षणार्थी प्रश्नावली प्रश्न क्र.४) वरून असा निष्कर्ष निघतो की विविध प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी अध्यापक महाविद्यालयामध्ये

साधनांची उपलब्धता आहे. परंतु प्रत्यक्ष निरीक्षणाअंती व प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २ व ३ च्या प्रतिसादावरून असे दिसून येते की काही अध्यापक महाविद्यालयात अत्यावश्यक अशी शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही. विशेषत: जी महाविद्यालये विनाअनुदानित आहेत त्या ठिकाणी साधनांची उपलब्धता कमी आहे. (प्रकरण चार सारणी क्र. ४.९, पृ. क्र.७९ ) सबब अशी शिफारस करावीशी वाटते की त्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने सर्वच कॉलेजिसना शैक्षणिक साधनांची उपलब्धता करून देण्यासाठी भरपूर अनुदान द्यावे. तसेच प्रत्येक कॉलेजने समाजातील उदार व्यक्ती व संस्था यांच्याकडून देणगी रूपाने पैसा जमवावा.

५) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.१० (उपलब्ध साधनांचा परिपूर्ण उपयोग होतो की नाही) सारणी क्र. ४. ११ (उपलब्ध साधनांचा परिपूर्ण उपयोग होतो असे वाटण्याची कारणे) सारणी क्र. ४.१२ (उपलब्ध साधनांचा परिपूर्ण उपयोग होत नाही असे वाटण्याची कारणे) वरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयातील उपलब्ध साधनांचा परिपूर्ण उपयोग होतो असे ८१ (६७.५० टक्के) प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविले असले तरी उपलब्ध साधनांचा परिपूर्ण उपयोग होण्यामध्ये साधने दाखविण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. प्राध्यापकांची पुरेशी संख्या नाही या दोन समस्या उद्भवतात. पहिल्या समस्येबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की विद्यार्थ्यांना साधने दाखविण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. म्हणजे त्या साधनांचा वापर कसा करावयाचा हे विद्यार्थ्यांना समजेल व ती साधणे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष हाताळता येतील. दुसऱ्या समस्येबाबत या पूर्वीच पा.क्र. १९५ वर शिफारस केलेली आहे.

६) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ३.१३ (प्रात्यक्षिकांना ठेवलेले गुण त्याच्या महत्वानुसार योग्य आहेत की नाही) वरून व प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविलेल्या बदलाच्या प्रतिसाद वरून असा निष्कर्ष निघतो की, प्रात्यक्षिकांना जे गुण ठेवलेले आहेत ते त्यांच्या महत्वानुसार योग्यच आहेत.

७) प्रकरण चार मधील सारणी क्र. ४.१४ (२० ही सराव पाठ संख्या अध्यापन कौशल्ये येण्याच्या दृष्टीने पुरेशी आहेत की नाही) वरून असा निष्कर्ष निघतो की २० ही सराव पाठ संख्या अध्यापक कौशल्ये येण्याच्या दृष्टीने अपूरी आहे. बहुसंख्य अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींना (५७.५० टक्के) ही संख्या अपुरी वाटते.

८) प्रकरण चार मधील सारणी क्र. ४.१५ (२० ही सराव पाठ संख्या अध्यापन कौशल्ये येण्याच्या दृष्टीने पुरेशी ठरते असे सुचविण्याची कारणे) सारणी क्रमांक ४.१६ (२० ही सराव पाठ संख्या पुरेशी नाही असे वाटण्याची कारणे) यांमधील कारणांना दिलेल्या प्रतिसादाची तुलना करता असा निष्कर्ष निघतो की पुढील कारणांमुळे २० ही सराव पाठ संख्या पुरेशी ठरत नाही.

१. अध्यापन कौशल्यांच्या मानाने पाठाची संख्या फारच अपुरी आहे.
२. पाठ टाचणातील सर्व संज्ञा समजत नाहीत.
३. शाळेतील विद्यार्थ्यांकडून योग्य असे सहकार्य मिळत नाही.
४. पाठ टाचण काढण्यास पुरेसा वेळ मिळत नाही.
५. मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते.

या कारणांबाबत अशा शिफारशी कराव्याशा वाटतात की, पाठाची संख्या २० ऐवजी ३० इतकी पूर्वीप्रमाणे (१९८४ पूर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे) करावी. कारण पाठाचा जितका सराव होईल तितके त्याचे दृढीकरण होईल त्यामुळे विविध अध्यापन कौशल्य आत्मसात करण्यास जास्त सराव मिळेल. तसेच पाठातील संकल्पना समजण्यास मदत होईल. पाठासाठी विद्यार्थी सहकार्य व्यवस्थित मिळण्यासाठी तेथील संबंधित शिक्षकांनी व पाठ निरीक्षक प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना सहकार्य देण्यासाठी सूचना द्याव्यात. त्यासाठी अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्राध्यापकांना व तेथील मुख्याध्यापकांना सुचना द्याव्यात. पाठ टाचण काढण्यासाठी पुरेसा वेळ मिळण्यासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला

आठवडयातून एकच सराव पाठ घेण्यास सांगावा. तसेच घटक शाळेतून आणण्यास न सांगता प्राध्यापकांनीच तो घटक वेळापत्रकां बरोबर प्रशिक्षणार्थींना द्यावा म्हणजे विद्यार्थ्यांचा वेळ वाचेल व टाचण काढण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. तसेच संबंधित शिक्षण संस्थेने व प्राचार्यांनी प्राध्यापक नेमते वेळेस मेथडचा विचार करूनच नेमले जावेत म्हणजे विविध सराव पाठासाठी मार्गदर्शन करणारे प्राध्यापक कमी पडणार नाहीत.

९) प्रकरण चारमधील सारणी क्र. ४.१७ (सूक्ष्म अध्यापन पाठाची पाचही संख्या अध्यापन कौशल्ये येण्यासाठी पुरेशी आहे की नाही) वरून असा निष्कर्ष निघतो की पाच ही सूक्ष्म अध्यापन पाठाची संख्या अध्यापनाची सूक्ष्म कौशल्ये येण्यास पुरेशी आहेत. बहुसंख्य अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींना (५२.५० टक्के) ही संख्या पुरेशी वाटते.

१०) प्रकरण चारमधील सारणी क्र. ४.१८ (सूक्ष्म अध्यापन पाठाची संख्या पुरेशी आहे असे म्हणण्याची कारणे) सारणी क्र. ४.१९ (सूक्ष्म अध्यापन पाठाची संख्या पुरेशी नाही असे वाटल्याची कारणे) वरून असा निष्कर्ष निघतो की सूक्ष्म अध्यापनाची पाच ही संख्या सूक्ष्म घटक कौशल्ये येण्यासाठी पुरेशी आहे असे ५२.५० टक्के प्रशिक्षणार्थींनी सुचविलेले असले तरी त्याच्या कार्यवाहीमध्ये पाठाचे टाचण काढताना गोंधळ निर्माण होतो, सूक्ष्म पाठासाठी दिला जाणारा वेळ फारच अपुरा आहे, मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. या समस्या उद्भवतात. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की पाठाचे टाचण कसे काढावे यासाठी सूक्ष्म पाठ घेणे अगोदर प्रत्येक घटक कौशल्यानुसार टाचण कसे काढावे याची माहिती प्रत्यक्ष सूक्ष्म पाठ घेणे पूर्वी एक दिवस द्यावी व पक्के टाचण तयार झाल्यानंतरच पाठ घेऊ दिला जावा. प्रत्येक सूक्ष्म घटक कौशल्यास किमान तीन दिवस वेळ दिला जावा. म्हणजे सूक्ष्म पाठाच्या सरावामध्ये अध्यापन पूर्णराध्यापक ही सारखी कौशल्य आत्मसात होईपर्यन्त चालू ठेवता येईल व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करता येईल.

११) चौथ्या प्रकरणातील विद्यार्थी प्रश्नावलीच्या ८ व्या प्रश्नाला (समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्य यासाठी कोणती प्रात्यक्षिके घेतली जातात) मिळालेल्या प्रतिवादावरून हे स्पष्ट होते की अध्यापक महाविद्यालयातील समाजसेवा व समाजोपयोगी उत्पादक कार्य यासाठी राबविलेल्या उपक्रमामध्ये वेगवेगळ्या महाविद्यालयात विविधता दिसून येते व हे सर्व कार्यक्रम अभ्यासक्रमाला धरूनच निवडलेले दिसतात.

१२) प्रकरण चारमधील सारणी क्र. ४,२० (बी.एड्. अभ्यासक्रमातील समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्य यांची कार्यवाही योग्य प्रकारे होते की नाही) सारणी क्र. ४.२१ (समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्य यांची कार्यवाही योग्य प्रकारे होण्याची कारणे) सारणी क्र. ४.२२ (समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्यांची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही असे सुचविण्याची कारणे) वरून असा निष्कर्ष निघतो की ६७.५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे सुचविले असेल तरी त्यांच्या कार्यवाहीमध्ये प्रात्यक्षिकांना ठेवलेला वेळ अपुरा आहे. कॉलेजकडून पुरेशी साधने उपलब्ध होत नाहीत थेअरीचा भाग योग्य प्रकारे समजावून दिला जात नाही, पुरेसा पैसा कॉलेजकडून उपलब्ध होत नाही, विद्यार्थी प्रात्यक्षिकांचे महत्व जाणून घेत नाहीत. ५० टक्केला उत्तीर्ण त्यामुळे प्रात्यक्षिकाकडे दुर्लक्ष या अडचणी येतात.

याबाबत अशा शिफारशी कराव्याशा वाटतात की समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्यांचा आठवड्यातून जो वेळापत्रकात तास असतो तो नियमित घेतला जावा त्यामुळे पुरेसा वेळ मिळेल. प्रथम या प्रात्यक्षिकांच्या थिअरीचा भाग समजावून द्यावा व नंतर प्रात्यक्षिके करावयास सांगावीत. प्राध्यापकांनी प्रशिक्षणार्थ्यांना समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्य याचे योग्य मार्गदर्शनाद्वारे व थेअरी व्याख्यानाद्वारे महत्व पटवून द्यावे. इतर

अडचणींच्या बाबत या अगोदरच पृष्ठ क्र. १९५ वर शिफारशी केलेल्या आहेत.

१३) प्रकरण चारमधील सारणी क्र. ४.२३ (सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही योग्य प्रकारे होते की नाही) सारणी क्र. ४.२४ (सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे सुचविण्याची कारणे) सारणी क्र. ४.२५ (सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही असे सुचविण्याची कारणे) वरून असा निष्कर्ष निघतो की ७१.६० टक्के प्रशिक्षणार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे सुचविले असले तरी सांस्कृतिक कार्यक्रमांना वेळ अपुरा पडतो. सांस्कृतिक कार्यक्रमांना अनावश्यक कार्यक्रमांचा समावेश होतो, फक्त ... दहा कार्यक्रम कोटा पूर्ण करण्यासाठी घेतले जातात, नियोजनबध्द कार्यक्रमांची आखणी नाही, विद्यार्थ्यांमधील अंतर्गत गटबाजी प्रशिक्षित मार्गदर्शकांचा अभाव, ठराविक विद्यार्थीच सहभागी होतात या अडचणी येतात.

या बाबतीत अशा शिफारशी कराव्याशा वाटतात की, सांस्कृतिक कार्यक्रमांना आठवडयातून एक तासिके ऐवजी दोन तासिका इतका वेळ वाढवून द्यावा. सांस्कृतिक कार्यक्रम नियोजन पूर्ण होण्यासाठी कार्यक्रम सादर करण्यापूर्वी किमान आठ दिवस अगोदर प्रशिक्षणार्थ्यांना प्राध्यापकांनी त्या कार्यक्रमाच्या स्वरूपाची कल्पना द्यावी. सांस्कृतिक कार्यक्रमातील अनावश्यक कार्यक्रम टाळण्यासाठी कार्यक्रम साद र करण्यापूर्वी प्राध्यापकांनी कार्यक्रम योग्य आहे की नाही त्याची चाचणी घ्यावी. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या तासाला तज्ज्ञ व्यक्तींना बोलावून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. प्राध्यापकांनी कार्यक्रम शांततेने योग्य प्रकारे कसा पार पाडला जाईल इकडे लक्ष द्यावे. सर्वांनी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेण्याची सक्ती करावी. त्यासाठी कुल पध्दतीचा वापर करावा. चांगले सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडणाऱ्यांना वैयक्तिक व कुलवार पारितोषिके द्यावीत.

१४) प्रकरण चारमधील प्रशिक्षणार्थी प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१४ (प्रकल्पासाठी निवडलेले विषय) ला दिलेल्या प्रतिसादावरून असा निष्कर्ष निघतो की सर्व अध्यापक महाविद्यालयात प्रकल्पाचे जे विषय निवडलेले आहेत त्यामध्ये विविधता आहे. ते अभ्यासक्रमाला धरूनच व उपयुक्त होतील असेच निवडलेले आहेत.

१५) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.२६ (प्रकल्पाची आवश्यकता आहे की नाही ते जाणणे) वरून असा निष्कर्ष निघतो की, अध्यापक महाविद्यालयात प्रकल्पाची अत्यंत आवश्यकता आहे. प्रकल्पाची आवश्यकता आहे असे बहुसंख्य ९३ टक्के विद्यार्थ्यांनी सुचविले आहे.

१६) चौथ्या प्रकरणातील प्रकल्पाची आवश्यकता आहे यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी दिलेली कारण पहाता (पृ.क्र. 115 ) असा निष्कर्ष निघतो की प्रकल्पाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणे अभ्यासक्रमात योग्य असे स्थान दिलेले दिसून येत नाही. सबब अशी शिफारस करावीशी वाटते की अभ्यासक्रम मंडळाने (बी.ओ.एस.) यापेक्षा ही व्यापक व चांगल्या प्रकल्पांचा अभ्यासक्रमात समावेश करावा. त्यासाठी निश्चित विषय दिले जावेत. त्याच्या गुणसंख्येत २० वरून ५० इतकी वाढ करण्यात यावी.

१७) प्रकरण तीनमधील विद्यार्थी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १५ च्या प्रतिसादावरून असा निष्कर्ष निघतो की (प्रकरण ४ पृ.क्र. 117 ) मानसशास्त्रीय प्रयोगांची १३ ही संख्या अध्ययनाची गतीशिल वैशिष्टे येण्यासाठी पुरेशी आहे तसेच ही १३ ही संख्या अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया व थेअरीचा भाग समजण्यासाठी उपयुक्त ठरते (पृ.क्र. 121 ) परंतु मानसशास्त्रीय प्रयोगाच्या कार्यवाहीमध्ये प्रयोगाचे साहित्य हाताळण्यास दिले जात नाही ही अडचण दिसून येते.

सबब अशी शिफारस करावीशी वाटते की मानसशास्त्रीय प्रयोग करत असताना शिक्षकांनी ते साहित्य आधीदर करुन हाताळावयाचे ते विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थ्यांना दाखवून हाताळण्यास यावे म्हणजे विद्यार्थ्यांना कृतीतून शिक्षण मिळेल.

१८) चौथ्या प्रकरणात प्रशिक्षणार्थी प्रश्नावलतील १६ व्या प्रश्नात शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकामध्ये कोणकोणत्या प्रात्यक्षिकांचा समावेश होतो या बाबत नोंदविल्या गेलेल्या प्रात्यक्षिकांच्या आधारे असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयात शारीरिक शिक्षणासाठी जी प्रात्यक्षिके घेतली जातात ती योग्य व अभ्यासक्रमाला धरुनच घेतलेली आहेत.

१९) चौथ्या प्रकरणातील सारणी क्रमांक ४.३१ (शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते की नाही) सारणी क्र. ४.३२ (शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे सुचविण्याची कारणे) सारणी क्र. ४.३३ (शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही असे सुचविण्याची कारणे) वरुन असा निष्कर्ष निघतो की शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे ६५.८० टक्के प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविले असले तरी त्याच्या कार्यवाहीमध्ये वेळ अपुरा पडतो, प्रात्यक्षिकांच्या फक्त थेअरीचा भाग लिहून दिला जातो, पुरेशी साधने उपलब्ध नाहीत, प्रात्यक्षिके घाईमध्ये उरकली जातात या समस्या उद्भवतात.

प्रात्यक्षिकांच्या फक्त थेअरीचा भाग लिहून दिला जातो या अडचणी-बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की शारीरिक शिक्षणाच्या फक्त थेअरीचा भाग लिहून न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्रीडांगणावर नेऊन विविध खेळांची माहिती द्यावी. त्यासाठी आठवड्यातून एक ऐवजी दोन शारीरिक शिक्षणाच्या तासिका ठेवाव्यात. इतर अडचणी बाबत यापूर्वीच पृ.क्र. १९५ वर शिफारशी केलेल्या आहेत.

२०) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.३४ (शैक्षणिक साधने योग्य प्रकारे करवून घेतली जातात काय ?) सारणी क्र. ४.३५ (शैक्षणिक साधने कोणत्या कारणांमुळे तयार करवून घेतली जातात) सारणी क्र. ४.३६ शैक्षणिक साधने योग्य प्रकारे तयार करवून घेतली जात नाहीत असे सुचविण्याची कारणे) वरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयातून योग्य प्रकारे शैक्षणिक साधने तयार करवून घेतली जातात असे ८०.३० टक्के प्रशिक्षणार्थ्यांनी जरी सुचविले असले तरी त्यांच्या कार्यवाहीमध्ये तज्ज्ञ व्यक्तींचे योग्य मार्गदर्शन मिळत नाही, पुरेसा वेळ मिळत नाही अडचणी उद्भवतात.

या अडचणी बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की सर्व अध्यापक महाविद्यालयात एन.सी.इ.आर.टी. या संस्थेमध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञ अशा व्यक्तींना बोलावून एक आठवडाभर शैक्षणिक साधने तयार करण्याचे कृतिसत्र आयोजित करावे.

२१) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. ४.३७ (वार्षिक पाठ परीक्षेची आवश्यकता आहे की नाही) व वार्षिक पाठ परीक्षेची आवश्यकता आहे असे सुचविण्याची कारणे पहाता अध्यापक महाविद्यालयात वार्षिक पाठ परीक्षेची गरज आहे. अध्यापक महाविद्यालयात वार्षिक पाठ परीक्षेची आवश्यकता आहे असे १०५ (८८.०० टक्के) प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविले आहे.

२२) प्रकरण चार मधील प्रश्न क्रमांक १९ व्या शेवटच्या उपप्रश्नाला (बी.एड्. महाविद्यालयातील वार्षिक पाठ घेताना कोणत्या अडचणी येतात) दिलेल्या प्रतिसादावरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयात वार्षिक पाठ घेतेवेळेस प्रशिक्षणार्थ्यांना पुढील समस्या येतात.

१. वार्षिक पाठ घेण्याचे दडपण मनावर येते.
२. एकाच वर्गावरती सलग दोन वार्षिक पाठ असतील तर पहिला विद्यार्थी पाठ लवकर सोडत नाही त्यामुळे वेळ अपुरा पडतो.
३. पाठ निरीक्षक पूर्णवेळ पाठ पहात नाहीत त्यामुळे योग्य मूल्यमापन होत नाही.
४. वर्गातील मुलांची संख्या जास्त असल्यामुळे वर्ग नियंत्रण राहू शकत नाही.

वरील समस्या क्र.१ बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की पाठ परीक्षापूर्वी प्रशिक्षणार्थींना वार्षिक पाठ सराव पाठाप्रमाणेच घ्यावयाचे असतात त्यामध्ये घाबरण्याची जरूरी नाही अशा सूचना संबंधित प्राध्यापकांनी देऊन योग्य असे वातावरण निर्माण करावे.

अडचण क्रमांक दोन बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की एकाच वर्गावरती सलग असे दोन वार्षिक पाठ कॉलेजने टाकू नयेत. तशी प्राचार्यांनी वार्षिक पाठ नियोजन करणाऱ्या प्राध्यापकांना सूचना द्यावी. टाकावाच लागत असेल तर पहिल्या प्रशिक्षणार्थीस पाठ वेळेत सोडण्याची सूचना पाठ संयोजकांनी द्यावी. वार्षिक पाठ परीक्षा प्रमुखांनी इतर सर्व परीक्षकांना पाठ पूर्ण वेळ पाहिला जावा अशी कडक सूचना द्यावी. थेअरी परीक्षाप्रमाणेच वार्षिक पाठ परीक्षेसाठी विद्यापीठाने आकस्मित तपासणी पथक पाठवून पाठ परीक्षक पाठाचे पुरेसा वेळ व योग्य प्रकारे परीक्षण करतात की नाही ते पहावे.

अडचण क्र. चार बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, ज्या वर्गावरती वार्षिक पाठ असेल त्या वर्गातील विद्यार्थी संख्या ३० ते ३५ इतकीच ठेवण्यास संबंधित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांना सूचना द्याव्यात.

५.३ प्रात्यक्षिके करवून घेत असताना प्राध्यापकांना येणाऱ्या समस्याबाबत निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत विभागात प्रकरण क्रमांक पाच (अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रात्यक्षिके करवून घेत असताना येणाऱ्या समस्या) यामधील प्राध्यापकांच्या समस्यांचा विचार केला असता प्राध्यापकांच्या प्रश्नावलीद्वारा आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्याचे विवरण केलेले आहे आणि त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

१) प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांपैकी १३ टक्के अध्यापकांकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता आहे.

२) प्रश्नावली भरून देणाऱ्या ८७ टक्के अध्यापकांनी कला-शास्त्र व शिक्षणशास्त्र या दोन्ही शाखांतील पदव्युत्तर पदव्या घेतलेल्या आहेत.

३) प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा सरासरी अनुभव ६.०४१ वर्षे आहे. हा अनुभव बरा आहे असे म्हणता येईल.

वरील तिन्हीही निष्कर्षांचा विचार केला असता ८७ टक्के प्राध्यापकांकडे किमान पदवी असू नये किंवा त्यांपैकी कोणीही आपल्या विषयातील अत्युच्च पदवी मिळविण्यासाठी प्रयत्नशील असू नये ही बाब चिंतनीय वाटते. तरी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वा विद्यापीठीय शैक्षणिक मंडळाने आवश्यक ती शैक्षणिक पात्रता ८ वर्षांऐवजी पाच वर्षांत अनिवार्य करावे. त्यासाठी अभ्यास रजा वा तत्सम इतर सोयी सवलती उपलब्ध करून द्याव्यात. कोणत्याही प्रकारे किमान शैक्षणिक पात्रतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड स्वीकारू नये.

४) प्रकरण पाच मधील (अध्यापक महाविद्यालयातील सर्व प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते की नाही) प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ५

वरून असा निष्कर्ष निघतो की, अध्यापक महाविद्यालयातील सर्व प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे ६०.८० टक्के प्राध्यापकांनी सुचविले असले तरी त्याच्या कार्यवाहीमध्ये वेळ अपुरा पडतो, साहित्य उपलब्ध होत नाही, तज्ज्ञ मार्गदर्शक व प्रशिक्षित प्राध्यापकांचा अभाव या समस्या येतात असे दिसते.

५) पाचव्या प्रकरणातील सारणी क्र. ५.४ (अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम करवून घेत असताना येणाऱ्या अडचणी) वरून प्रात्यक्षिक काम करवून घेत असताना येणाऱ्या अडचणींचा अनुक्रम पुढील प्रमाणे लावता येईल.

| | |
|---|---|
| १) पुरेसा वेळ मिळत नाही. | १९ |
| २) वेळेच्या मानाने प्रात्यक्षिकांची संख्या जास्त आहे. | १७ |
| ३) प्रात्यक्षिके पार पाडण्यासाठी पुरेसे हॉल नाहीत | १३ |
| ३) विविध प्रात्यक्षिकांसाठी प्रशिक्षण झालेले नाही | १३ |
| ४) विविध शैक्षणिक साधनांचा अभाव | १२ |
| ४) पुरेशी प्राध्यापक संख्या नसल्याने काम जास्त पडते | १२ |
| ५) विद्यार्थ्यांचे योग्य सहकार्य मिळत नाही | ८ |
| ६) प्रात्यक्षिक काम कॉलेज अंतर्गत असल्याने विद्यार्थी दुर्लक्ष करतात | ७ |
| ६) कॉलेजकडून योग्य असे सहकार्य मिळत नाही | ७ |
| ७) विद्यार्थ्यांचा दर्जा योग्य नसतो | २ |
| ८) उपस्थिती समाधानकारक नसते | ० |

वरील प्रतिसादावरून असा निष्कर्ष निघतो की प्रात्यक्षिके करवून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही, प्रात्यक्षिकांची संख्या जास्त आहे, शैक्षणिक साधनांची कमतरता, प्राध्यापकांची संख्या अपुरी, विविध प्रात्यक्षिकांसाठी प्राध्यापकांचे प्रशिक्षण झालेले नाही या खऱ्या अडचणी आहेत.

निष्कर्ष क्रमांक ४ व ५ याबाबत या अगोदरच प्रकरण क्रमांक ५ विभाग-अ मध्ये शिफारशी केलेल्या आहेत. (पहा पृ.क्र. १९५ )

६) पाचव्या प्रकरणातील सारणी क्रमांक ५.५ च्या प्रतिसादावरून व इतर सुचविलेल्या गोष्टीवरून असा निष्कर्ष निघतो की विविध प्रात्यक्षिकांना लागणारे साहित्य उपलब्ध व्हावे, आटोपशीर अभ्यासक्रम असावा, स्वतंत्र हॉलची सोय असावी, प्राध्यापकांची संख्या पुरेशी असावी, तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन व्हावे, प्राध्यापकांना विविध प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीसाठी लागणारे प्रशिक्षण यावे, महाविद्यालयाने आर्थिक भार उचलावा.या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होण्यासाठी आवश्यक गोष्टी आहेत. सबब अशी शिफारस करावीशी वाटते की, वरील गोष्टींची पूर्तता कॉलेजने विद्यापीठाने व विद्यापीठ अनुदान मंडळाने करावी.

७) अध्यापक महाविद्यालयात प्राध्यापक मंचची स्थापना करावी. अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांनी एकत्र येऊन बी.एड्. प्रात्यक्षिक कामातील अडचणींचा विचार करण्यासाठी त्यावर मात कशी करता येईल, याचा विचार करण्यासाठी आणि अध्यापक महाविद्यालयातील अध्ययन अध्यापन विषयक बाबींच्या विचार विनिमयासाठी प्राध्यापक मंचची स्थापना करावी. अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी अशा तऱ्हेचे एक व्यासपीठ आवश्यक आहे.

८) प्रात्यक्षिकांना ठेवलेल्या उद्दिष्टांची पूर्तता होते असे १५ (६५ टक्के) प्राध्यापकांनी सुचविले असले तरी उद्दिष्ट साध्य होण्यामध्ये -

१. वेळ अपुरा पडतो त्यामुळे प्रात्यक्षिके घाईमध्ये पूर्ण केली जातात.
२. प्रात्यक्षिकांची नक्कल विद्यार्थी करतात.
३. पुरेशी शैक्षणिक साधने उपलब्ध नाहीत.
४. प्रात्यक्षिकांचे योग्य मूल्यमापन होत नाही या समस्या निर्माण होतात.

वरील क्र. १ व ३ या समस्याबाबत या पूर्वीच प्रकरण सहा विभाग-१ मध्ये शिफारशी केल्या आहेत.

समस्या दोन प्रात्यक्षिकांची नक्कल विद्यार्थी करतात या समस्येबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, प्रत्येक विद्यार्थ्याला प्राध्यापकांनी प्रत्येक प्रात्यक्षिकांसाठी वेगवेगळे विषय द्यावेत.

समस्या क्रमांक चार बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, प्रात्यक्षिकांचे योग्य मूल्यमापन होण्यासाठी प्रात्यक्षिकांचा दर्जा पाहूनच वस्तुनिष्ठपणे प्राध्यापकांनी विविध प्रात्यक्षिकांना गुण द्यावेत. तशी प्राचार्यांनी प्राध्यापकांना समज द्यावी.

९) सारणी क्र. ५.६ वरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयातील सराव पाठ व सूक्ष्म पाठ या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही. त्याच्या कार्यवाहीमध्ये पुढील अडचणी येतात :

१. वेळ अपुरा पडतो.
२. सराव पाठ व सूक्ष्म पाठ यांची संख्या कमी आहे.
३. विद्यार्थ्यांना विषयज्ञान कमी असते.
४. प्राध्यापकांची संख्या अपुरी आहे.
५. शैक्षणिक साधने अपुरी आहेत.
६. पाठ टाचण काढणे अवघड जाते.
७. सूक्ष्म पाठासाठी प्रशिक्षित प्राध्यापकांचा अभाव.

वरील अडचणीपैकी अडचण क्रमांक १, २, ४, ५, ७ याबाबत यापूर्वीच प्रकरण सहा विभाग-१ मध्ये शिफारशी केलेल्या आहेत.

अडचण क्रमांक ३ बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्या पदवी गुणाच्या बरोबरच विषयज्ञान चाचणी घेऊन त्यातील ही गुणांचा विचार व्हावा.

अडचण क्रमांक ६ बाबत अशी शिफारस करावीशी वाटते की ही समस्या प्राध्यापकांनी स्वत: व्यवस्थित मार्गदर्शन देऊन सोडवावी.

१०) समाज सेवा समाज उपयोगी उत्पादक कार्य या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्य प्रकारे होते असे ५७ टक्के प्राध्यापकांनी सुचविले असेल तरी या प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीमध्ये वेळ अपुरा पडतो, सर्व साधने उपलब्ध होत नाहीत. प्रत्यक्षा वेळापत्रकातील तासाचे केलेला हा कार्यक्रम न घेता वर्षातून एकदा घेतला जातो, तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा अभाव या समस्या उद्भवतात असे दिसते.

सबब अशी शिफारस करावीशी वाटते की या प्रात्यक्षिकांना वेळ वाढवून द्यावा, वेळापत्रकातील तासाप्रमाणेच त्यांची कार्यवाही व्हावी, शक्य असल्यास तज्ज्ञ व्यक्तींना बोलावून त्या द्वारे समाज उपयोगी उत्पादक कार्यांच्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही व्हावी.

११) सांस्कृतिक कार्यक्रम व शारीरिक शिक्षण या प्रात्यक्षिकासाठी योग्य उपक्रम राबविले जात असले तरी त्यांच्या कार्यवाहीमध्ये पुढील समस्या येतात.

१. तासिका कमी पडतात.

२. साहित्याचा अभाव.

३. तज्ज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाचा अभाव.

या समस्या दिसून येतात.

याबाबत या अगोदरच प्रकरण सहा विभाग-१ पृ. क्र. 195 वरती शिफारशी केल्या आहेत.

१२) सारणी क्र. ५.८ वरून प्रकल्पाची आवश्यकता आहे यासाठी दिलेल्या कारणांचा विचार करता अध्यापक महाविद्यालयात प्रकल्पांची अत्यंत गरज आहे असा निष्कर्ष निघतो.

१३) सारणी क्र. ५.९ वरून असा निष्कर्ष निघतो की सर्व प्रात्यक्षिकांना ठेवलेले गुण हे योग्यच आहेत.

१४) सारणी क्र. ५.१० व ५.१२ व मानसशास्त्री प्रयोगांची १३ ही संख्या अध्ययनाची गतीशील वैशिष्टे येण्यासाठी पुरेशी आहेत. यांच्या कारणांच्या प्रतिसादांवरून असा निष्कर्ष निघतो की मानसशास्त्रीय प्रयोगाची १३ ही संख्या पुरेशी आहे व त्याची कार्यवाही योग्य प्रकारे होते.

१५) सारणी क्र. ५.११ वरून असा निष्कर्ष निघतो की सूक्ष्म पाठ व सराव पाठ यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

१६) सारणी क्रमांक ५.१३ वरून असा निष्कर्ष निघतो की सर्व प्रात्यक्षिकांना दिला जाणारा वेळ वाढवून घावा.

१७) शैक्षणिक साधने तयार करण्याच्या प्रात्यक्षिकामध्ये शैक्षणिक साधने तयार करवून घेत असताना पुरेसा वेळ मिळत नाही, पुरेसा पैसा उपलब्ध होत नाही, शैक्षणिक साधने कशी तयार करावयाची याचे पुरेसे ज्ञान, प्राध्यापकांना नसते. या समस्या येतात.

या समस्याबाबत या पूर्वीच प्रकरण सहा विभाग-१ मध्ये पा.क्र. १९५ वर शिफारशी केलेल्या आहेत.

१८) सारणी क्र. ५.१४ व वार्षिक पाठाची आवश्यकता आहे असे सुचविणाऱ्यांची कारणे वरून असा निष्कर्ष निघतो की अध्यापक महाविद्यालयात वार्षिक पाठ परीक्षेची आवश्यकता आहे.

५.४ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :

१) सर्व प्रात्यक्षिकांना वेळ वाढवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी बी.एड्. अभ्यासक्रम दोन वर्षांचा करणेची गरज आहे.

२) विविध प्रात्यक्षिकांना ठेवलेल्या उद्दिष्टांची पूर्तता होत नाही. त्यासाठी विविध प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीसाठी प्रशिक्षित प्राध्यापकाची उपलब्धता, शैक्षणिक साधनांची उपलब्धता, कोणत्या प्रात्यक्षिकांमधून कोणती उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत हे स्पष्ट करणे या गोष्टींची आवश्यकता आहे.

३) सर्व अध्यापक महाविद्यालयात प्रात्यक्षिकांसाठी लागणाऱ्या साहित्याची कमतरता दिसून येते. विशेषत: विनाअनुदानित कॉलेजमध्ये त्याचा अभाव जास्त दिसून येतो.

४) प्रात्यक्षिके पार पाडण्यासाठी प्राध्यापकांची संख्या १०:१ या प्रमाणात पुरेशी दिसून येत नाही. विशेषत: विना अनुदान कॉलेजमध्ये प्राध्यापकांची संख्या फारच अपुरी असलेली दिसून येते. त्यासाठी पुरेशी प्राध्यापक संख्या भरणेसाठी विद्यापीठाने सक्ती करावी.

५) समाजसेवा व समाज उपयोगी उत्पादक कार्य या प्रात्यक्षिकांची कार्यवाही योग्यप्रकारे होत नाही. त्यासाठी वेळ अपुरा पडतो, साधनांचा अभाव, प्रशिक्षित मार्गदर्शकांचा अभाव या समस्या दिसून येतात.

६) सूक्ष्म पाठ व सराव पाठ यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी सराव पाठ संख्या पूर्वी प्रमाणेच ३० व सूक्ष्म पाठ संख्या ७ ते १० इतकी करण्यात यावी.

७) सर्व प्रात्यक्षिकांना ठेवलेले गुण हे त्यांच्या महत्वानुसार योग्य असलेले दिसून येतात. परंतु ते गुण व्यक्तिनिष्टपणे न देता वस्तुनिष्ठपणे विचार करून देणे आवश्यक आहे.

८) अध्यापक महाविद्यालयात प्रकल्पाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी योग्य विषयावर प्रकल्प राबविले जातात. परंतु त्याचे महत्व विचारात घेता प्रकल्पाला त्याच्या महत्वानुसार अभ्यासक्रमात योग्य स्थान द्यावयास हवे त्यासाठी २५ ऐवजी ५० गुणाचा याच्यापेक्षा व्यापक प्रकल्प देणे आवश्यक आहे.

९) सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रात्यक्षिकामध्ये योग्य कार्यक्रमाचा अभाव शैक्षणिक साधनांचा अभाव, तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा अभाव अशा समस्या येतात असे दिसते. यासाठी योग्य कार्यक्रम व तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन व्हावे असे वाटते.

१०) शैक्षणिक साधने तयार करणेचे प्रात्यक्षिकांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकाचा अभाव पुरेसे आर्थिक सहाय्य नाही. साधनांचा अभाव या समस्या येतात. यासाठी एन.सी.ई.आर.टी. मार्फत तज्ज्ञ शिक्षक यातून शैक्षणिक साधने तयार करण्यासाठी आठवडाभर कृतिसत्र घेण्यात यावे,

११) मानसशास्त्रीय प्रयोगांची १३ ही संख्या अध्यापनाची गतिशील वैशिष्ट्ये येण्यासाठी पुरेशी आहेत त्यांची कार्यवाही योग्य प्रकारे होते.

१२) विनाअनुदानित कॉलेजमध्ये पुरेशी प्राध्यापक संख्या, शैक्षणिक साधने, विविध प्रात्यक्षिकांसाठी स्वतंत्र हॉल याची उपलब्धता होण्यासाठी त्यांना अनुदान देण्यात यावे.

१३) वार्षिक पाठ परीक्षेची आवश्यकता आहे असे दिसून येते वार्षिक पाठ परीक्षा मुंबई विद्यापीठाप्रमाणे बंद न करता जशी आहे तशी पुढेही चालू ठेवण्यात यावी.

१४) समाजसेवा, समाज उपयोगी उत्पादक कार्य, सूक्ष्म अध्यापन, शैक्षणिक साधने तयार करणे, या प्रात्यक्षिकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय व्हावी.

५.५ पुढील संशोधनासाठी कांही विषय :

या अभ्यास प्रकल्पातून मिळालेल्या अनुभवांती व मिळालेल्या निष्कर्षांवरून पुढील संशोधनासाठी खालील प्रमाणे विषय सुचविता येतील.

१) प्रस्तुत संशोधनात अध्यापक महाविद्यालयात प्रकल्पाची आवश्यकता आहे असे निष्कर्षांवरून दिसून आले आहे. तथापि यासंबंधी अध्यापक महाविद्यालयातील प्रकल्पांची परिणामकारकता जाणून घेण्यासाठी अधिक मूलगामी संशोधन होणे आवश्यक आहे.

२) अध्यापक महाविद्यालयातील सराव पाठ संख्या ही विविध अध्यापन कौशल्ये येण्याच्या दृष्टीने अपुरी आहे. ही संख्या पुरेशी का नाही यासंबंधी प्रस्तुत शोध निबंधात विचार केलेला असला तरी या संबंधी अधिक मूलगामी संशोधन होणे आवश्यक आहे.

३) प्रस्तुत शोध निबंधात अध्यापक महाविद्यालयातील सूक्ष्मपाठाची संख्या वाढविणे आवश्यक आहे असे सूचित होते. या सूक्ष्म पाठाची संख्या वाढविली असता त्याचा सराव पाठ चांगले होण्यासाठी किती उपयोग होतो यासंबंधी संशोधन होणे आवश्यक आहे.

४) प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन अधिक यथार्थ विश्वसनीय, उद्दिष्टांनुसारी होणे आवश्यक आहे, त्यासाठी मूल्यमापनाची विविध साधने वापरणे अनिवार्य आहे अशा त-हेची उद्दिष्टाधिष्ठित विविध साधने कोणती, त्याचे स्वरूप काय, ती कशी तयार करावयाची यासंबंधी संशोधन होणे आवश्यक आहे.

५) मानसशास्त्रीय प्रयोगांची १३ ही संख्या अध्ययनाची गतिशील वैशिष्ट्ये येण्यासाठी पुरेशी का ठरते या संबंधीच्या कारणांचा शोध प्रस्तुत

संशोधनात घेतला असला तरी मानसशास्त्रीय प्रयोगामुळे बी.एड्. भाग-१ मधील पेपर नं. २ शैक्षणिक मानसशास्त्र याच्या थेअरीचा भाग कितपत समजतो व अध्ययन-अध्यापन प्रक्रिया समजण्यास कितपत मदत होते या संबंधी देखील संशोधन होणे आवश्यक आहे.

६) प्रस्तुत संशोधन विषयातील विविध प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीचा प्रशिक्षणार्थींना त्यांच्या भावी शिक्षण व्यवसायात कितपत उपयोग होतो या संबंधी वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांवरती स्वतंत्र असे संशोधन होणे आवश्यक आहे.

७) प्रस्तुत संशोधनात अध्यापक महाविद्यालयातील उपलब्ध साधनांचा व त्याच्या परिपूर्ण उपयोगाचा विचार झालेला असला तरी प्रत्येक प्रात्यक्षिकासाठी कोणकोणते साहित्य उपलब्ध आहे, त्याचा उपयोग कसा केला जातो, त्याच्या उपयोगाची परिणामकारता जाणून घेणे यासाठी वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांबाबत वेगवेगळे स्वतंत्र संशोधन होणे आवश्यक आहे.